छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक
बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड
मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

# मराठवाडा दर्शन

Mo.9028349999
E-Mail : marathwadadarshannews@gmail.com
MARATHWADA DARSHAN
संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

प्रतिनिधी पाहिजेत
" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०४ | अंक -१९ | शुक्रवार दि.०४ सप्टेंबर २०२६ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-04 | Issue 19 | FRIDAY DT.04 SEPTEMBER 2026 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4







# बीड जिल्ह्यात कडकडीत बंद; बाजारपेठेत शुकशुकाट

बीड : मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी, दि. ३ सप्टेंबर रोजी बीड जिल्ह्यात बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला व्यापारी, व्यावसायिक तसेच नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने बीड शहरासह जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये बाजारपेठा कडकडीत बंद राहिल्या.

बीड शहरात सकाळपासूनच बहुतांश दुकाने उघडण्यात आली नाहीत. त्यामुळे मुख्य बाजारपेठेसह विविध व्यापारी भागात दिवसभर शुकशुकाट दिसून आला. बीड तालुक्यातील पिंपळनेर, चौसाळा, नेकनूर, मांजरसुंबा, पालवण, वडवणी फाटा, लिंबागणेश, चर्हाटा परिसरासह विविध गावांमध्येही बंदला प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त होत असल्याने मराठा समाज बांधवांमध्ये तीव्र भावना निर्माण झाल्या आहेत. सरकारच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी गुरुवारी संपूर्ण मराठवाड्यात बंदचे आवाहन करण्यात आले होते.

बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, आष्टी, पाटोदा, केज, अंबाजोगाई, धारूर, परळी वैजनाथ, वडवणी आदी तालुक्यांमध्येही बंदचा परिणाम जाणवला. अनेक ठिकाणी दुकाने, व्यापारी आस्थापना बंद ठेवण्यात आल्याने बाजारपेठांमध्ये नेहमीच्या तुलनेत वर्दळ मोठ्या प्रमाणात कमी होती.बंदच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून बीड शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, महामार्ग तसेच शासकीय कार्यालयांच्या परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात आली.

बंदमुळे शहरात कामानिमित्त आलेल्या नागरिकांना काही प्रमाणात गैरसोयीला सामोरे जावे लागले. तसेच रस्त्यांवरील वाहतूक आणि नागरिकांची वर्दळही नेहमीच्या तुलनेत कमी असल्याचे दिसून आले. बीड शहरातील माळीवेस, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे चौक, नगर रोड, बार्शी नाका, जालना रोड, मोंढा परिसर आदी भागांमध्ये अनेक दुकाने बंद असल्याने सर्वत्र शांतता आणि शुकशुकाटाचे वातावरण होते.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावर सरकारने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली. मागण्यांवर समाधानकारक निर्णय न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही आंदोलकांकडून देण्यात आला.

## आंदोलनस्थळीच बीडच्या आंदोलकाचा मृत्यू

आंतरवाली सराटी,(प्रतिनिधी)
सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासह विविध मागण्यांसाठी आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज सहावा दिवस आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मराठा बांधव आंतरवाली सराटीत दाखल होत असतानाच, गुरुवारी एक दुर्दैवी घटना घडली. जरांगे पाटलांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या बीड जिल्ह्यातील एका मराठा आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.दशरथ रायकर (रा. संगम, जि. बीड) असे मृत आंदोलकाचे नाव आहे. रायकर हे मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आंतरवाली सराटीत आले होते. बुधवारी रात्री ते येथील एका शेतात झोपले होते. मात्र, आज सकाळी ते उशिरापर्यंत उठले नाहीत. त्यामुळे त्यांना तातडीने अंबड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

## अंकुश पाचपुते यांच्यावर कॉँग्रेसने सोपविली मोठी जबाबदारी

**बीड जिल्हा सचिवपदी निवड; पक्षवाढीसाठी इमानेइतबारे काम करण्याचा निर्धार**

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते अंकुश दादा पाचपुते यांची अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याने गेवराईसह परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.निवडीनंतर आयोजित सत्कार समारंभात मनोगत व्यक्त करताना नवनिर्वाचित जिल्हा सचिव अंकुश दादा पाचपुते म्हणाले, काँग्रेस पक्षाने माझ्या निष्ठेवर आणि कार्यावर विश्वास ठेवून मला हे पद दिले आहे. पक्षाने सोपविलेली जबाबदारी इमानेइतबारे पार पाडत पक्षाची विचारधारा आणि ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न



करणार आहे. आगामी काळात पक्ष संघटना मजबूत करून पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे.

सामाजिक कार्यातून जनसामान्यांशी जोडले गेलेले पाचपुते यांची जिल्हा सचिवपदी निवड झाल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. त्यांच्या निवडीमुळे गेवराई तालुक्यात काँग्रेस संघटनेला बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.यावेळी डिजिटल मीडिया गेवराई तालुका अध्यक्ष सुरेश आहेर, माजी पंचायत समिती सदस्य महादेव काका औटी, सतीश दादा दाभाडे, प्रमोद पवार, युवराज धोत्रे आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी अंकुश दादा पाचपुते यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा

### आ. विजयसिंह पंडित यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

गेवराई । प्रतिनिधी
मराठा आरक्षणासह विविध न्याय्य मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण तातडीने सोडविण्यासाठी राज्य सरकारने सकारात्मक व निर्णायक भूमिका घ्यावी, अशी मागणी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह शारदादेवी शिवाजीराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मनोज जरांगे पाटील हे दि. २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी उपोषणास बसले आहेत. मराठा समाजाच्या भावना, अपेक्षा आणि अस्वस्थता लक्षात घेता या आंदोलनाबाबत शासनाने संवेदनशीलतेने विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे आ. पंडित यांनी निवेदनात नमूद केले आहे.



मराठा समाजाने राज्याच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासात मोठे योगदान दिले आहे. शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने समाज मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहे. मात्र, उत्पादनातील अनिश्चितता, अल्पभूधारकता आणि वाढता शैक्षणिक खर्च यामुळे आर्थिकदृष्ट्या मराठा समाजातील अनेक कुटुंबे अडचणीत आहेत. सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाचे वस्तुनिष्ठ पुरावेही समाजाकडून शासनास देण्यात आले आहेत, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

शैक्षणिक संधी वाढविण्यासह सरकारी सेवेत योग्य प्रतिनिधित्व मिळण्याची गरज निर्माण झाली असून, मराठा समाजाची आरक्षणाची मागणी ही इतर कोणत्याही समाजाच्या हक्कांवर अतिक्रमण करणारी नसल्याचेही आ. पंडित यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या कायदेशीर व हक्काच्या मागणीवर ठोस निर्णय होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या अनुषंगाने महायुती सरकार संवेदनशील रित्या निर्णय घेईल, अशी माझी धारणा आहे. त्यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होण्यापूर्वी शासनाने उच्चस्तरीय चर्चा करून विश्वासार्ह तोडगा काढावा. त्यांच्या मागण्यांबाबत स्पष्ट भूमिका, ठोस कार्यवाहीचे वेळापत्रक आणि कायदेशीरदृष्ट्या टिकणाऱ्या निर्णयाची दिशा निश्चित करून संवादातून मार्ग काढावा, अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी केली.

महाराष्ट्रातील सामाजिक ऐक्य व शांतता अबाधित ठेवण्यासाठी मराठा समाजाच्या भावना व अपेक्षांना योग्य न्याय देत मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण तात्काळ सोडविण्यासाठी सरकारने सकारात्मक व निर्णायक भूमिका घ्यावी, असेही त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## संकल्प लोकशाही पत्रकार संघाचा गौरव मराठवाड्यातील भूमिपुत्रांचा

रामेश्वर तागडे/उपसंपादक
लोकशाही पत्रकार संघ भारत यांच्या संकल्पनेतून विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी 'भव्य मराठवाडा सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. मराठवाड्याच्या विविध क्षेत्रांत आपल्या कार्यातून समाजासाठी योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा या सोहळ्यात 'उत्कृष्ट पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून समाजाच्या विविध घटकांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचा आणि त्यांच्या कार्याची दखल व्यापक स्तरावर घेण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शिक्षण, शिक्षक क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, आरोग्य क्षेत्र, शेतकरी क्षेत्र, क्रीडा क्षेत्र, राजकीय क्षेत्र तसेच गुणवंत विद्यार्थी व आदर्श शिक्षक अशा विविध क्षेत्रांचा पुरस्कारासाठी समावेश करण्यात आला आहे.



मान्यवरांच्या उपस्थितीत होणार सन्मान

या भव्य सोहळ्यात मराठवाडा अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य श्री. रामेश्वर तांगडे पाटील हे कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून भूमिका बजावणार आहेत. तसेच मा. आरोग्य मंत्री श्री. राजेश भैया टोपे साहेब यांना 'मराठवाडा भूषण सन्मान मूर्ती' म्हणून गौरविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी जाहीर केले आहे.

लोकशाही पत्रकार संघ भारतचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. बी. बी. वैद्य यांचाही या कार्यक्रमात सहभाग असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

कर्तृत्वाचा गौरव हीच समाजाची प्रेरणा

समाजामध्ये अनेक व्यक्ती कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता आपल्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असतात. अशा व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सार्वजनिक व्यासपीठावर सन्मानित करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा गौरव झाल्यास नव्या पिढीला देखील समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळते.

'सन्मान कार्याचा, अभिमान मराठवाड्याचा' या भावनेतून आयोजित करण्यात आलेला हा सोहळा मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील कर्तृत्वाला एकत्र आणणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांचा समावेश

या सन्मान सोहळ्यामध्ये खालील क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींचा गौरव करण्यात येणार आहे-







महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय शौर्य पुरस्कार महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार राजर्षी शाहू महाराज राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार संत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थी पुरस्कार बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार पु. ल. देशपांडे राज्यस्तरीय साहित्य व कला पुरस्कार यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय नेतृत्व पुरस्कार वसंतराव नाईक राज्यस्तरीय कृषिभूषण पुरस्कार राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय आदर्श माता पुरस्कार अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार स्वामी विवेकानंद राज्यस्तरीय युवा प्रेरणा पुरस्कार ध्यानचंद राज्यस्तरीय क्रीडारत्न पुरस्कार संत तुकाराम राज्यस्तरीय लोकसेवा पुरस्कार संत रविदास राज्यस्तरीय सामाजिक समता पुरस्कार कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय शिक्षणरत्न पुरस्कार उद्योगरत्न राज्यस्तरीय उत्कृष्ट उद्योजक पुरस्कार आरोग्यभूषण राज्यस्तरीय उत्कृष्ट वैद्यकीय सेवा पुरस्कार कृषिरत्न राज्यस्तरीय आदर्श शेतकरी पुरस्कार समाजरत्न राज्यस्तरीय उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार पत्रकाररत्न राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार लोकसेवा राज्यस्तरीय आदर्श अधिकारी पुरस्कार युवा नेतृत्व राज्यस्तरीय युवा समाजसेवक पुरस्कार महिला शक्ती राज्यस्तरीय नारीशक्ती पुरस्कार महाराष्ट्र गौरव राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार मराठवाडा भूषण राज्यस्तरीय विशेष सन्मान पुरस्कार सामाजिक व विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणारे मान्यवर २७ सप्टेंबर रोजी रंगणार सन्मानाचा सोहळा आयोजकांच्या माहितीनुसार रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अचूक स्थळ निमंत्रणपत्रिकेत अद्याप नमूद करण्यात आलेले नाही.

या कार्यक्रमासाठी श्री. कैलास वाडकर, श्री. संदीप काळे, श्री. रमेश राव वैद्य आणि श्री. राजाभाऊ ढाळे यांना कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच लोकशाही पत्रकार संघ मराठवाडा विभाग यांच्याही सहभागातून कार्यक्रमाची शोभा वाढणार आहे.

मराठवाड्याच्या कर्तृत्वाला मिळणार नवे व्यासपीठ

मराठवाड्याच्या सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी, आरोग्य, क्रीडा आणि इतर क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान म्हणजे त्यांच्या कार्याचा गौरव तर आहेच, पण समाजाला सकारात्मक दिशा देणाऱ्या विचारांचा सन्मानही आहे.

या भव्य 'मराठवाडा सन्मान सोहळ्या'स नागरिकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी, पत्रकार बांधवांनी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आणि पुरस्कारार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

'सन्मान कार्याचा... अभिमान मराठवाड्याचा!'

मराठवाड्याच्या कर्तृत्वाला सलाम! नाव नोंदणी साठी संपर्क :

श्री रामेश्वर तांगडे पाटील
मराठवाडा अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य
मो .न .८०१०४४०१२८



# कोल्हापुरात ना. पंकजाताई मुंडे यांचं उत्स्फूर्त स्वागत

## कणेरी मठाच्या श्री सिध्दगिरी पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे थाटात लोकार्पण




कोल्हापूर - पशुवैद्यकीय विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधनाचा थेट उपयोग पशुपालकांच्या जीवनमानात व उत्पन्नात वाढ करण्यासाठी झाला पाहिजे. पशुधनाचे आरोग्य, उत्पादकता आणि व्यवस्थापन सुधारल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते. त्यामुळे पशुवैद्यकीय महाविद्यालये केवळ पदवी देणाऱ्या संस्था न राहता पशुपालकांच्या समस्या सोडविणारे ज्ञान व तंत्रज्ञान केंद्र झाले पाहिजे अशी अपेक्षा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे व्यक्त केली.

कणेरी येथील श्री सिध्दगिरी मठाच्या श्री सिद्धगिरी पशुवैद्यकीय विज्ञान महाविद्यालयाचे लोकार्पण आज ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आयोजित पशुपालक मेळाव्यास त्यांनी संबोधित केले. मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, पशुपालकांच्या दारापर्यंत आधुनिक पशुवैद्यकीय सेवा आणि तंत्रज्ञान पोहोचणे ही आजची गरज आहे. पशुधनातील आजारांचे वेळेवर निदान, प्रतिबंधात्मक लसीकरण, संतुलित पशुआहार, प्रजनन व्यवस्थापन आणि आधुनिक पशुपालन पद्धतींचा अवलंब यामुळे पशुपालकांच्या उत्पादन खर्चात बचत आणि उत्पन्नात वाढ होऊ शकते. पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील प्रत्यक्ष समस्या समजून घेऊन त्यावर स्थानिक पातळीवर व्यवहार्य उपाय विकसित करण्यासाठी संशोधन करावे. पदवी मिळाल्यानंतर केवळ शासकीय किंवा खासगी नोकरीच्या संधींच्या मागे न लागता स्वतः रोजगार निर्माण करणारे पशुवैद्यकीय उद्योजक घडणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आधुनिक पशुवैद्यकीय क्लिनिक, निदान केंद्रे, मोबाईल पशुवैद्यकीय सेवा, डेअरी फार्म व्यवस्थापन, पशुखाद्य व पोषण सल्ला, प्रजनन सेवा, पशुधन विमा, डिजिटल सल्ला सेवा आणि दुग्धजन्य पदार्थांचे मूल्यवर्धन या क्षेत्रांत तरुण पशुवैद्यकांसाठी मोठ्या संधी असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण युवकांसोबतच महिलांना पशुपालन व दुग्धव्यवसायातील निर्णयप्रक्रियेत आणि आर्थिक उपक्रमांमध्ये अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमास पशुविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, आ. अमल महाडिक, अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, जि.प. अध्यक्ष प्रियाताई शिंदे, डॉ. के. एम. एल. पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

# महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण; तुळजापूरच्या दोघांवर गुन्हा दाखल




पैठण प्रतिनिधी : मधुकर बर्फे

पैठण : वीज चोरी रोखणे आणि थकीत वीजबिल वसुलीसाठी कर्तव्यावर गेलेल्या महावितरण पथकातील कर्मचाऱ्याला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना तुळजापूर येथील शाहागड रोड परिसरात घडली. याप्रकरणी भगवत दत्तात्रय सोनवणे व महेश दत्तात्रय सोनवणे, रा. तुळजापूर, ता. पैठण, यांच्याविरुद्ध पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे १० वाजता महावितरणचे पथक वीज चोरी तपासणी व थकीत वीजबिल वसुलीसाठी तुळजापूर परिसरात गेले होते. यावेळी महावितरण कर्मचारी अंगद सुरुदेव बनवे यांच्यासोबत वाद झाला. वाद वाढल्यानंतर बनवे यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी तसेच गळा पकडून मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

घटनेनंतर सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी सुमारे ६.२० वाजेपर्यंत गुन्हा दाखल करण्यास विलंब झाल्याचा आरोप महावितरण कर्मचारी व संघटनेकडून करण्यात आला आहे. या विलंबामागे राजकीय हस्तक्षेप झाल्याचा आरोपही करण्यात आला असून, महावितरण संघटनेने आक्रमक भूमिका घेतल्यानंतर गुन्हा नोंदविण्यात आला असे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

शासकीय कर्तव्य बजावत असताना. वीज चोरी तपासणी व बिल वसुलीच्या कामादरम्यान कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून सहकार्याला मारहाण झाल्याने महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. याप्रकरणी पुढील तपास पैठण पोलिस करत आहे

# ग्रामऊर्जा फाऊडेशनच्या माध्यमातुन दिव्यांगांना उद्योजकता विकास प्रशिक्षण




किल्ले धारूर/अविनाश जगताप

दिव्यांग बांधवांना स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगता यावे, स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि रोजगारासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागू नये, या उद्देशाने ग्रामऊर्जा फाउंडेशन दिव्यांग बांधवांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे.याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून ३५ दिव्यांग बांधवांची दुसरी बॅच यशस्वीरीत्या पूर्ण झाली. या प्रशिक्षणातून सहभागींच्या कौशल्यांना दिशा देण्यासोबतच व्यवसायाच्या संधी, व्यवसाय नियोजन आणि स्वावलंबनासाठी आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले.मार्गदर्शन: डइख ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था बीड व सहकार्य: इनेबल इंडिया आयोजक: ग्रामऊर्जा फाऊंडेशनदिव्यांगत्व अडथळा नाही योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाले तर स्वावलंबनाची नवी वाट नक्कीच निर्माण होऊ शकते!

# मुक्रमाबाद पोलिसांची धडक कारवाई

## लखमापूर फाट्याजवळ गुटख्याची तस्करी उघड; ५ लाख ५९ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त



दैनंदिन मराठवाडा दर्शन महाराष्ट्र राज्य

नांदेड जिल्हा प्रतिनिधी शुभम पाटील बिहारीपूरकर

लखमापूर फाट्याजवळ अवैध गुटख्याची वाहतूक करणाऱ्या महिंद्रा मॅक्स वाहनावर मुक्रमाबाद पोलिसांनी कारवाई करत तब्बल ५ लाख ५९ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.नांदेड-बिदर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ अ वरील लखमापूर फाट्याजवळ सावरमाळ ते मुखेड जाणाऱ्या रस्त्यावरून बेकायदेशीररीत्या गुटख्याची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती १ सप्टेंबर २०२६ रोजी मुक्रमाबाद पोलिसांना मिळाली.या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू चव्हाण सर यांच्या मार्गदर्शनाखाली लखमापूर फाट्याजवळ पंचांसमक्ष सापळा रचण्यात आला.

संशधित महिंद्रा मॅक्स वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विमल पान मसाला, त१ तंबाखू, सागर गुटखा, पान मसाला व इतर तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले.महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थ आढळले जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ५,५९,७६० रुपये महिंद्रा मॅक्स वाहन क्र. चक २२ छ ४६७२ ताब्यात दोन आरोपी ताब्यात गुटख्याची किंमत ५९ हजार वाहन क्रमांक चक २२ छ ४६७२ ची अंदाजे किंमत ५ लाख रुपये असून, असा एकूण ५ लाख ५९ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

# मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा माजलगाव शहर कडकडीत बंद




शांततेत बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद; व्यापारी, नागरिक व विविध संघटनांचा स्वयंस्फूर्त सहभाग

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात कडकडीत बंद मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी सुरु असलेल्या मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दशवित माजलगाव शहरात आज कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील व्यापारी, नागरिक, विविध सामाजिक संघटना आणि मराठा समाजबांधवांनी स्वयंस्फूर्तपणे बंदमध्ये सहभाग घेतला.मुख्य बाजारपेठ, व्यावसायिक आस्थापाने, दुकाने व अनेक सेवा बंद राहिल्याने शहरातील व्यवहार पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र दिसून आले. रस्त्यांवर नेहमीच्या तुलनेत वर्दळ कमी होती.

माजलगाव बंद

बंद दरम्यान शहरात पूर्णतः शांततापूर्ण वातावरण राहिले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने प्रमुख चौक व संवेदनशील ठिकाणी कडक बंदोबस्त ठेवला होता.आंदोलनकर्त्यांनी शासनाने मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. एकूणच, माजलगाव शहरातील बंद शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्स्फूर्त प्रतिसादासह पार पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला माजलगावचा भक्कम पाठिंबा; शहर कडकडीत बंद, शांततेत आंदोलन यशस्वी!

# विरा मेडिसिटी हॉस्पिटलमध्ये माजी मंत्री बबनराव लोणीकर यांची भेट

## रुग्णाची आस्थेवाईकपणे केली विचारपूस; डॉक्टर व कर्मचाऱ्यांशी साधला संवाद



कुंभार पिंपळगाव /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा ज्येष्ठ नेते मा. श्री. बबनराव लोणीकर यांनी जालना येथील विरा मेडिसिटी हॉस्पिटलला भेट देऊन उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णाची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. यावेळी त्यांनी रुग्णाच्या प्रकृतीची माहिती घेत डॉक्टरांशी चर्चा केली.या भेटीदरम्यान हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुहास विघ्ने, डॉ. राजेंद्र राख सर, बाबासाहेब आटोळे, राम शिरगिरे तसेच हॉस्पिटलमधील इतर डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते.लोणीकर यांनी हॉस्पिटलमधील उपचार व्यवस्था व रुग्णांना देण्यात येणाऱ्या सुविधांचीही माहिती घेतली. रुग्णांना वेळेवर व दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी उपस्थित डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचे स्वागत करून विविध वैद्यकीय सेवांबाबत माहिती दिली.

# अमोल घोडके यांची निरपेक्ष किर्तन सेवा संस्था तालुका संपर्क प्रमुख पदी निवड



अंबाजोगाई(प्रतिनिधी)

संत सावता महाराज मंदीर समितीचे विश्वस्त,सांप्रदायिक क्षेत्रातील व्यक्तिमत्व अमोल महाराज घोडके यांची निरपेक्ष किर्तन सेवा संस्थेने अंबाजोगाई तालुका संपर्क प्रमुख पदी निवड केली आहे. या संदर्भातील नियुक्तीपत्र राष्ट्रीय अध्यक्ष नाना महाराज कापडणीस,राष्ट्रीय सचिव साहेबराव गवळी, प्रदेशाध्यक्ष माऊली महाराज गुरव यांच्या स्वाक्षरीने प्रदान करण्यात आले आहे.

अमोल महाराज घोडके सांप्रदायिक अधिष्ठानाच्या माध्यमातून वारकरी सांप्रदायाची किर्ती सर्वदुर पर्यंत पोहंचवित आहेत.त्यांच्या या कार्याची दखल घेऊन निरपेक्ष किर्तन सेवा संस्थेच्या वतीने त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्ती झाल्याबद्दल पं.उद्धव आपेगांवकर,अच्युत महाराज जोशी, अंबादास चिक्षे, बालासाहेब जोशी, दशरथ कदम यांच्यासह अनेकांनी अमोल महाराज घोडके यांचे अभिनंदन केले आहे.

# १००१ वृक्षांच्या लागवडीतून धानोरा महाविद्यालयाचा पर्यावरण संवर्धनाचा जागर

महाराष्ट्र भूषण माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेला कृतीची जोड; 'एक विद्यार्थी-एक झाड'चा संदेश

आष्टी (अण्णासाहेब साबळे)

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली असताना कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धानोरा (ता. आष्टी) येथे १००१ वृक्षांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देण्यात आला. महाराष्ट्र भूषण तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला.

महाविद्यालय परिसर अधिक हिरवागार करण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली. वाढते प्रदूषण, बदलते हवामान, कमी होत चाललेले वनक्षेत्र तसेच पाण्याची समस्या या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड ही केवळ औपचारिकता न राहता वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले यांनी सांगितले की, १००१ वृक्षांच्या लागवडीमुळे महाविद्यालय परिसराच्या सौंदर्यात भर पडण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत



सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होणार आहे. केवळ वृक्ष लावून थांबू नका; लावलेल्या प्रत्येक रोपाची नियमित देखभाल करून त्याचे संगोपन करा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

'एक विद्यार्थी-एक झाड'चा संकल्प

महाराष्ट्र भूषण भीमराव धोंडे यांच्या पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत महाविद्यालयाने १००१ वृक्षांची लागवड केल्याने या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवून आपल्या परिसरातही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी, असे आवाहन प्रा. राजू शेलार यांनी केले.

प्रा. निसार शेख यांनी 'एक विद्यार्थी-एक झाड' या भावनेतून विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन केल्यास भविष्यात महाविद्यालय परिसर हिरवाईने फुलून येईल. तसेच पुढील पिढीसाठी स्वच्छ, सुंदर व निरोगी पर्यावरण निर्माण करण्यास या उपक्रमाचा मोठा हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त केला.

प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले, प्रा. गहिनीनाथ एकशिंगे, प्रा. राजू शेलार, प्रा. विवेक महाजन, प्रा. आजिनाथ गिलचे, प्रा. सुभाष मोरे, प्रा. आतेश बनसोडे, प्रा. शबाना शेख, प्रा. जयश्री बोडखे, प्रा. ज्ञानदेव बोडखे, प्रा. सतीश तागड, प्रा. बालशंकर, प्रा. संजय झांजे, प्रा. वाळके तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.१००१ वृक्षांच्या लागवडीने धानोरा परिसरात पर्यावरण संवर्धनाचा हरित संदेश पोहोचला असून, लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन झाले तर हा उपक्रम भविष्यात एक आदर्श पर्यावरण चळवळ ठरू शकतो.

# शिक्षक : ज्ञानाचा दीप ते भविष्याचा शिल्पकार

डॉ. राजेंद्र बगाटे

५ सप्टेंबर हा दिवस देशभरात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्याचा किंवा शाळा-महाविद्यालयांमध्ये औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही. शिक्षणाचे व्यक्ती आणि समाजाच्या विकासातील महत्त्व समजून घेण्याचा, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याचा आणि भावी पिढी घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याचा हा दिवस आहे. माणसाच्या जीवनात अनेक व्यक्ती येतात; परंतु त्याच्या विचारांना आकार देणाऱ्या, सुप्त क्षमतांना दिशा देणाऱ्या आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्याला केवळ अक्षरज्ञान देत नाही, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतो. प्रश्न विचारणे, विचार करणे, निर्णय घेणे, अडचणींना सामोरे जाणे आणि जबाबदारीने वागणे या जीवनकौशल्यांची जडणघडणही शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षक हा केवळ शिक्षणव्यवस्थेतील एक घटक नसून समाजाच्या भवितव्याला आकार देणारा शिल्पकार आहे.

बालकाच्या समाजीकारण व व्यक्तिमत्त्वविकासात शाळेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे आणि या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात असंख्य प्रश्न, कल्पना आणि विविध क्षमता दडलेल्या असतात. काही विद्यार्थी अभ्यासात प्रगती करतात, काही कला-क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काही विज्ञान, तंत्रज्ञान, नेतृत्व किंवा सामाजिक कार्यात विशेष रस दाखवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. ती ओळखून योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. विद्यार्थ्यांच्या उणिवांवर भर देण्याऐवजी त्यांच्या सामर्थ्याचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन देणारा शिक्षक त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देऊ शकतो. विद्यार्थ्याला 'तू हे करू शकतोस' असा विश्वास देणे ही शिक्षकाच्या कार्यातील सर्वांत मोठी शक्ती आहे.

आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक पुस्तके, दृक्-श्राव्य माध्यमे, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल वर्ग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या हातात माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, योग्य-अयोग्य माहितीमधील फरक समजून घेणे, विविध स्रोतांचे मूल्यमापन करणे आणि माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे ही कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात करून देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीच्या महासागरात योग्य दिशा दाखविणारा शिक्षक आजही तितकाच आवश्यक आहे.

तंत्रज्ञान शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि व्यापक करू शकते; मात्र ते शिक्षकाच्या मानवी भूमिकेची जागा घेऊ शकत नाही. संगणक माहिती देऊ शकतो, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रश्नांची उत्तरे देऊ शकते आणि डिजिटल माध्यमे अध्ययन सुलभ करू शकतात; परंतु विद्यार्थ्याच्या मनातील भीती ओळखणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, अपयशानंतर त्याला पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याच्या क्षमतेवर विश्वास निर्माण करणे हे मानवी शिक्षकच करू शकतो. शिक्षक-विद्यार्थी संबंधातील विश्वास, संवाद आणि भावनिक जवळीक यांना तंत्रज्ञान पर्याय ठरू शकत नाही. म्हणून भविष्यातील शिक्षणात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करताना मानवी संवेदनशीलतेचा समतोल राखणे आवश्यक आहे.

या बदलत्या शैक्षणिक वातावरणाचा विचार करताना ग्रामीण भारतातील वास्तवाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शहरांमधील अनेक विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट, डिजिटल वर्ग आणि विविध शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक कुटुंबांमध्ये एकच भ्रमणध्वनी असतो आणि तोही पालकांच्या दैनंदिन कामासाठी वापरला जातो. काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित असते, तर काही ठिकाणी वीजपुरवठ्याच्या अडचणींमुळे डिजिटल शिक्षणावर परिणाम होतो. त्यामुळे तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा विस्तार करताना डिजिटल दरी कमी करणे आवश्यक आहे. साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच ती प्रभावीपणे वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मात्र डिजिटल साधनांच्या अभावापेक्षा अधिक व्यापक आहे. अनेक विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर किंवा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांतून येतात. शेतीचे हंगामी स्वरूप, पीकनुकसान, आर्थिक अडचणी, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि घरातील जबाबदाऱ्या यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. शेतीच्या हंगामात काही मुलांना कुटुंबाला मदत करावी लागते, तर रोजगाराच्या शोधात कुटुंबाचे स्थलांतर झाल्यास त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला 'अभ्यासात मागे' म्हणून दोष देण्याऐवजी त्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण शिक्षक अशा विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशी सातत्याने संवाद साधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याचे प्रयत्न करतात. मर्यादित साधनांमध्येही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारा शिक्षक ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावतो.



ग्रामीण शाळा ही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी संस्था नसते; ती गावाच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असते. स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणसंवर्धन, पाणीबचत, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यामध्ये शाळेचा मोठा वाटा असतो. शिक्षक विद्यार्थ्यांसोबतच पालक आणि ग्रामसमाजाशी संवाद साधत असल्याने त्याचे कार्य वर्गखोलीच्या पलीकडे विस्तारते. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षकाची भूमिका अधिक संवेदनशील ठरते. घरकामाची जबाबदारी, शाळेचे अंतर, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि काही सामाजिक रूढी यांमुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ शकतात. अशा वेळी पालकांमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, मुलींना सुरक्षित वातावरण देणे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे शिक्षकाचे सामाजिक कर्तव्य ठरते. एका मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे तिच्यासोबत संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाच्या शक्यता वाढणे होय.

शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविणे एवढाच नसावा. गुण, श्रेणी आणि निकाल यांना महत्त्व असले तरी ते विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे मोजमाप करू शकत नाहीत. एखादा विद्यार्थी गणित किंवा विज्ञानात प्रावीण्य मिळवू शकतो, तर दुसरा साहित्य, संगीत, चित्रकला, क्रीडा, अभिनय किंवा सामाजिक कार्यात उत्कृष्ट ठरू शकतो. विद्यार्थ्यांची जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहकार्याची वृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सामाजिक संवेदनशीलता यांनाही शिक्षणात समान महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार केले पाहिजे. प्रत्येक मुलामध्ये असलेली वेगळी क्षमता शोधून तिला योग्य दिशा देणे हीच शिक्षणाची खरी कसोटी आहे.शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचारांची जडणघडण होणेही आवश्यक आहे. अफवा, चुकीची माहिती, अंधानुकरण आणि पूर्वग्रह वेगाने पसरत असताना प्रत्येक गोष्ट विवेकाने तपासण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली पाहिजे. 'हे असे का?' हा प्रश्न विचारण्याची वृत्ती ज्ञानाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत, मतभेद व्यक्त करावेत, माहितीची चिकित्सा करावी आणि स्वतःच्या निष्कर्षापर्यंत पोहोचावे, यासाठी शिक्षकाने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी त्रासदायक नसतो; तो जिज्ञासू असतो. अशा जिज्ञासेतूनच संशोधन, नवोन्मेष आणि सर्जनशील विचारांची निर्मिती होते.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असल्याने शिक्षकाची भूमिका सामाजिक समता आणि न्यायाच्या निर्मितीतही महत्त्वाची आहे. विविध सामाजिक, आर्थिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीची मुले एकत्र शिकतात. या विविधतेतून समानता, सहकार्य आणि बंधुभावाची जाणीव निर्माण करण्याची संधी शिक्षकाला मिळते. कोणत्याही विद्यार्थ्याशी त्याच्या सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीवरून भेदभाव होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. समावेशक शिक्षणाच्या काळात दिव्यांग विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी, विविध भाषिक पार्श्वभूमीची मुले आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना समान संधी देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शिकताना अडचण येत असेल, तर त्याला 'कमकुवत' ठरविण्याऐवजी त्याच्या शिकण्याची पद्धत समजून घेणे आणि आवश्यक ते वैयक्तिक मार्गदर्शन देणे अधिक योग्य ठरते.या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अनुकूल कार्यपरिस्थिती मिळणेही आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना शिक्षकांना आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, पुरेसा वेळ आणि सर्जनशीलतेला वाव देणारे वातावरण मिळते का, याचाही विचार झाला पाहिजे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामांचा वाढता भार शिक्षकांवर पडत असेल, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या वेळेवर होऊ शकतो. शिक्षकाला केवळ आदेशांचे पालन करणारा कर्मचारी न मानता शैक्षणिक प्रक्रियेतील महत्त्वाचा बौद्धिक घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक अध्यापनपद्धती, समावेशक शिक्षण आणि नवीन मूल्यमापन पद्धती याबाबत शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण मिळाले पाहिजे. स्वतः सतत शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची प्रेरणा निर्माण करू शकतो.आजच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडेही संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अभ्यासाचा ताण, स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि करिअरविषयीची चिंता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबाव अनुभवत असतात. काहींना आपल्या अडचणी व्यक्त करता येत नाहीत. अशा वेळी शिक्षकाचा संवेदनशील संवाद विद्यार्थ्यासाठी मोठा आधार ठरतो. 'तुझा निकाल काय?' या प्रश्नाबरोबरच 'तुला काही अडचण आहे का?' हा प्रश्न विचारण्याची संवेदनशीलताही शिक्षणाचा भाग आहे. विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुणांवर आधारित तुलना करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याच्या प्रगतीकडे पाहिले पाहिजे. घर आणि शाळा या दोन्हीकडून प्रोत्साहन मिळाल्यास विद्यार्थ्याचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो.पर्यावरणीय संकटे, पाण्याची समस्या, हवामानातील बदल, सामाजिक विषमता, बेरोजगारी, डिजिटल गैरवापर आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांसमोर आजचा समाज उभा आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही; सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीवही आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक संपत्तीचे जतन, सामाजिक सहकार्य, संविधानिक मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे ही शिक्षकाची व्यापक सामाजिक जबाबदारी आहे. आजच्या वर्गखोलीतून उद्याचा समाज घडत असतो. त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन आणि त्याचे आचरण या दोन्हींचा विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव पडतो.शिक्षकाला दिलेली खरी आदरांजली म्हणजे केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी शुभेच्छा देणे नव्हे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि मूल्यांचा आपल्या जीवनात उपयोग करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता आहे. एखादा विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतो, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदत करतो, अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, स्वतःच्या यशाबरोबर समाजाचाही विचार करतो आणि संकटांना धैर्याने सामोरा जातो, तेव्हा त्याच्या वर्तनातून शिक्षकाच्या कार्याचे खरे प्रतिबिंब दिसते. शिक्षकाच्या कार्याचे अंतिम यश केवळ गुणपत्रिकेत नव्हे, तर विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात आणि जीवनमूल्यांत दिसून येते.

शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांचा गौरव करण्याबरोबरच शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याचा विचार करण्याचा दिवस आहे. समाजाने शिक्षकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवताना त्यांना आवश्यक साधने, प्रशिक्षण, सन्मान आणि विश्वास देणेही गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी केवळ शिक्षकांवर सोपवून समाजाची भूमिका संपत नाही. शासन, शिक्षणसंस्था, पालक, विद्यार्थी आणि समाज या सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा, सक्षम शिक्षकवर्ग आणि डिजिटल साधने उपलब्ध करून देणे ही सामाजिक गुंतवणूक आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तर त्याचा लाभ केवळ विद्यार्थ्यांना होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासाला मिळतो.

शिक्षक हा वर्तमानातील विद्यार्थ्याला भविष्याशी जोडणारा दुवा आहे. तो अज्ञानातून ज्ञानाकडे, भीतीतून आत्मविश्वासाकडे, अंधानुकरणातून चिकित्सक विचाराकडे आणि स्वकेंद्रिततेतून सामाजिक जबाबदारीकडे नेणारी वाट दाखवतो. त्याच्या हातात केवळ पुस्तक किंवा अध्यापनाचे साधन नसते; भावी समाज घडविण्याची जबाबदारीही असते. म्हणून शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून ज्ञानाचा, शिक्षणाचा आणि समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.

५ सप्टेंबरचा शिक्षक दिन एका दिवसापुरत्या औपचारिक शुभेच्छांमध्ये अडकून राहू नये. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण आणि समताधिष्ठित शिक्षण मिळावे, प्रत्येक शिक्षकाला सन्मानपूर्वक व अनुकूल कार्यपरिस्थिती मिळावी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, डिजिटल दरी कमी व्हावी, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि शिक्षणातून संवेदनशील, विवेकी व जबाबदार नागरिक घडावेत, हा व्यापक संकल्प या दिवसातून पुढे यायला हवा. शिक्षकाच्या हातातील खडू, लेखणी किंवा डिजिटल साधन हे केवळ अध्यापनाचे माध्यम नसते; त्यातून एका पिढीच्या विचारविश्वाची निर्मिती होत असते. म्हणूनच शिक्षक हा केवळ वर्गखोलीतील अध्यापक नसून उद्याच्या समाजाचा शिल्पकार आहे. ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मनःपूर्वक अभिवादन करणे, त्यांच्या कार्याला सक्षम वातावरण उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना समान संधी देणे हीच शिक्षक दिनाची खरी सार्थकता ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**



# मनोज पाटील जरांगे यांच्या उपोषणाला मुखेडमध्ये पाठिंबा आणि रास्ता रोको

दैनंदिन मराठवाडा दर्शन महाराष्ट्र राज्य
नांदेड जिल्हा प्रतिनिधी शुभम पाटील बिहारीपूरकर

मुखेड : मराठा आरक्षणाच्या मानगीसाठी अंतखाली सराटी येथे मनोज जरांगे यांच्या सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी मुखेड शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदला शहरातील व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.सकाळपासूनच सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक परिसरात मोठ्या संख्येने जना झाले होते. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकापासून शहरातील प्रमुख मार्गावर मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. 'आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे', तसेच 'एक मराठा, लाख मराठा' अशा घोषणांनी शहर दणाणून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या या बंदमध्ये सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते, युवक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बंदचे आवाहन करण्यासाठी कार्यकर्त्यांनी शहरातील व्यापारी व दुकानदारांशी संपर्क साधला. व्यापाऱ्यांनी या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत आपापल्या आस्थापना बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. दरम्यान, सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासमोर सुमारे एक तास

रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यामुळे काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. आंदोलनकर्त्यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, तसेच मनोज जरांगे यांच्या उपोषणाला शासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन मागण्या मान्य कराव्यात, अशी मागणी केली.

# सरकारच्या शिष्टमंडळाने घेतली मनोज जरांगेची भेट; जरांगेंच्या मागण्यांवर सरकारच्या शिष्टमंडळाची चर्चा

नांदेड। संदीप कदम बामणीकर

सातारा आणि कोल्हापूर गॅझेटचा जीआर सरकारने काढावा; मनोज जरांगेंची मागणी; कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकारी नेमणार- मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, हैदराबाद गॅझेटनुसार ओबीसी प्रमाणपत्रासाठी उपोषणावर ठाम असलेल्या मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीला सरकारचे शिष्टमंडळ पोहोचलं. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी प्रमाणपत्र मिळताना येणाऱ्या अडचणींचा पाढाच सरकारच्या शिष्टमंडळासमोर वाचून दाखवला.

सरकारच्या शिष्टमंडळामध्ये उद्योगमंत्री उदय सामंत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मकरंद पाटील यांच्यासह भाजप आमदार प्रसाद लाड हे मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी पोहोचले. सरकारच्या शिष्टमंडळासोबत मनोज जरांगे पाटील यांनी व्यासपीठावरून चर्चा केली. यावेळी ते म्हणाले की, सरकारच्या



नियमांनुसार वंशावळ ग्राह्य धरली जात नाही. त्याचबरोबर वंशावळ जोडली तरीही ओबीसी प्रमाणपत्र मिळत नाही. येत्या १० तारखेला प्रमाणपत्रांविषयी शासन निर्णय काढणार असल्याचं विखे पाटील यावेळी म्हणाले. मात्र, मनोज जरांगे पाटील यांनी १० तारखेला बैठकीऐवजी शासन निर्णय काढा, अशी मागणी केली. यावेळी जरांगे पाटील यांनी मंत्रालयामध्ये स्वतंत्र मराठा-कुणबी कक्ष हवा, अशी मागणी केली. मंत्रालयामध्ये कधी मराठा-कुणबी स्वतंत्र कक्षाची स्थापना करणार? अशी विचारणा जरांगे पाटील यांनी केली. यावेळी सरकारकडून प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रमाणपत्र देण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करणार असल्याची माहिती जरांगे पाटील यांना देण्यात आली.

दरम्यान, उद्यापासून (४ सप्टेंबर) कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचं आवाहन मराठा समाजाला करण्यात आलं आहे. त्यासाठी नातं, रक्ताचं नातं आणि कुळ या मुद्द्यांच्या आधारे ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत, त्यांना अर्ज करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. हैदराबाद गॅझेटनुसार ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटीसाठी अर्ज करण्याचं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे. ५ सप्टेंबरपर्यंत ग्रामपंचायतींमध्ये नोंदीची यादी लावण्यात येणार आहे. कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येणार असून त्यामध्ये काही अडचणी आल्या तर जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचं आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं. हैदराबाद गॅझेटनुसार ४ सप्टेंबरपासून मराठा समाजाने कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटचाही जीआर सरकारने काढावा अशी मागणी जरांगे यांनी मंत्र्यांकडे केली.

## २५% प्रवेश प्रक्रियेत अनियमिततेचा आरोप

# शाळांचे चुकीचे लोकेशन दाखवून पालकांची दिशाभूल?

अंबाजोगाई तालुक्यातील प्रवेश प्रक्रियेची चौकशी करून पालक-विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी

अंबाजोगाई प्रतिनिधी : उमेश शिंदे

अंबाजोगाई तालुक्यात गेल्या तीन वर्षांपासून आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत सातत्याने अनियमितता होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शाळांचे प्रत्यक्ष ठिकाणाचे लोकेशन ऑनलाइन प्रक्रियेत चुकीच्या ठिकाणी दाखविण्यात आल्याने अनेक पालकांना आपल्या परिसरातील शाळांची निवड करता आली नाही. परिणामी पालकांनी अर्ज भरल्यानंतर लोकेशन चुकीचे असल्याचे कारण देत काही विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

याबाबत १ सप्टेंबर २०२६ रोजी मा. उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांनी तालुक्यातील शाळांच्या लोकेशनची प्रत्यक्ष पाहणी करून त्यामध्ये असलेल्या त्रुटी वरिष्ठ कार्यालयाच्या निदर्शनास आणणे अपेक्षित होते. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तालुक्यातील शाळांचे लोकेशन योग्य आहे की नाही, याबाबत गटशिक्षणाधिकारी तसेच केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी व अहवाल घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आरटीई कायद्यानुसार स्वयंअर्थसहाय्यित शाळांची वेळोवेळी पाहणी करून आवश्यक माहिती वरिष्ठ कार्यालयाला देणे अपेक्षित असल्याचेही सांगण्यात आले आहे.

चुकीच्या लोकेशनमुळे अनेक पालकांना त्यांच्या पसंतीच्या शाळांची निवड करता आली नाही, तर काही विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाल्याने पालकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे संपूर्ण आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, तसेच प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

उपजिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात व्यक्तिशः लक्ष घालून अंबाजोगाई तालुक्यातील आरटीई प्रवेश प्रक्रियेतील अनियमिततेची चौकशी करावी आणि पात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# डॉल्बीविरोधात विवेकी भूमिका घेणाऱ्या विद्यानंद बापट यांच्यावरील हल्ल्याचा तीव्र निषेध! - प्राचार्य डी जी तांदळे

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा बीड**

बीड ।प्रतिनिधी

पुण्यात डॉल्बीच्या वापराला विरोध करत विवेकी आणि पर्यावरणपूरक भूमिका मांडणारे विद्यानंद बापट यांना मारहाण झाल्याची बातमी समाजमाध्यमांतून समोर आली आहे. या घटनेचा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तीव्र शब्दांत निषेध करते. असे जेष्ठ समाजसेवक प्राचार्य डी जी तांदळे यांनी सांगितले.आपल्या देशाचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट वारंवार दिसून येते धर्मातील अनिष्ट प्रथा, परंपरा आणि रूढींना प्रश्न विचारणाऱ्या, शंका उपस्थित करणाऱ्या आणि त्याविरोधात विवेकाची भूमिका घेणाऱ्या व्यक्तींना वैचारिक प्रतिवाद करण्याऐवजी हिंसेने गप्प करण्याचे प्रयत्न झाले आहेत.

गौतम बुद्धांच्या विचारांना विरोध करण्यासाठी त्यांच्याविरुद्ध कट रचले गेले. महात्मा ज्योतिराव फुले यांना ठार मारण्यासाठी मारेकरी पाठवले गेले. महात्मा गांधींची हत्या झाली. आणि आधुनिक काळात हा हिंसक प्रवाह डॉ. नरेंद्र दाभोलकर, प्रा. एम. एम. कलबुर्गी, कॉ. गोविंद पानसरे आणि गौरी लंकेश यांच्या हत्यांपर्यंत येऊन पोहोचला आहे असे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.विचारांचा प्रतिवाद विचारांनी करता येत नसेल, तर हिंसेचा आधार घेणे ही विवेकविरोधी मानसिकतेची लक्षणे आहेत. विद्यानंद बापट ज्या स्पष्टपणे, मुद्देसूदपणे आणि संदर्भांसह आपली भूमिका मांडत होते, त्या भूमिकेला वैचारिक उत्तर देण्याऐवजी त्यांच्यावर हल्ला करणे हा लोकशाही मूल्यांचा आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अपमान आहे.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या घटनेचा तीव्र निषेध करते असे प्राचार्य डी जी तांदळे यांनी प्रतिपादन केले आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांच्याकडे आमची स्पष्ट मागणी आहे की, या हल्ल्यात सहभागी असलेल्या व्यक्तींची त्वरित ओळख पटवून त्यांना अटक करावी आणि त्यांच्यावर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी. विवेकी भूमिका मांडणाऱ्या नागरिकांना संरक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सातत्याने पर्यावरणपूरक आणि विवेकवादी भूमिका घेतली आहे. ध्वनिप्रदूषण, पर्यावरणाचे नुकसान आणि सार्वजनिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत न्यायालयांनी तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी मार्गदर्शक भूमिका आणि निर्देश दिलेले आहेत. विद्यानंद बापट यांची भूमिका याच व्यापक पर्यावरणपूरक आणि विवेकवादी भूमिकेशी सुसंगत आहे.

म्हणून शासनाने स्वतःच्या कायदेशीर आणि पर्यावरणपूरक भूमिकेचा पुरस्कार करणाऱ्या नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे आणि धर्माच्या नावाखाली कायदा हातात घेणाऱ्यांना स्पष्ट संदेश द्यावा की, हिंसेला कोणत्याही परिस्थितीत माफी नाही. अशी मागणी

बीड शाखेने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केली आहे. पत्रकावर राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे,विवेक वाहिनीच्या राज्य कार्यवाह प्राचार्य डॉ सविता शेटे,जिल्ह्याचे उपाध्यक्ष प्राचार्य कॉ डी जी तांदळे, शाखा कार्याध्यक्ष प्रा विजय घेवारे,शाखा प्रधान सचिव विधिज्ञ करुणा टाकसाळ, व्यसन विरोधी प्रबोधन आणि संघर्ष विभागाचे प्रमुख बाजीराव ढाकणे, कायदे विषयक विभाग- प्रमुख विधिज्ञ अंबादास आगे,प्रसिद्धी प्रमुख डॉ संजय तांदळे,शुभांगी कुलकर्णी,किरण घाटगे यांच्या स्वाक्ष-या आहेत.पुण्यात डॉल्बीच्या वापराला विरोध करत विवेकी आणि पर्यावरणपूरक भूमिका मांडणारे विद्यानंद बापट यांना मारहाण झाल्याची बातमी समाजमाध्यमांतून समोर आली आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे विकास प्रतिष्ठान चाकणच्या वतीने जयंती उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप ; ज्येष्ठ कलावंतांचा सन्मान, महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' रंगला




माजलगाव ।प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे विकास प्रतिष्ठान, चाकण यांच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सदस्य नितीनसेठ गोरे, सत्यशोधक बहुजन आघाडीचे महाराष्ट्र अध्यक्ष सचिन बगाडे सर, चाकण नगर परिषदेच्या नगरसेविका अनिता श्रीराम घोगरे, नगरसेवक मंगेश कंडगे, महेश शेवकरी तसेच समीर भाई शिकीलकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे खेड तालुका अध्यक्ष भगवान शेठ मेदनकर तसेच भाजपा पुणे जिल्हा उपाध्यक्ष कालिदास दादा वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व परिवर्तनवादी विचारांना उजाळा देण्यात आला. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, शोषित, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेच्या व्यथा प्रभावीपणे मांडून समाजाला स्वाभिमान, समता आणि परिवर्तनाचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी तरुणांनी सामाजिक बांधिलकी जपत कार्य करावे, असे आवाहन मान्यवरांनी केले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत शालेय विद्यार्थ्यांना दप्तर व वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळाले. तसेच समाजासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांचा सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या भाषणातून अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आजच्या समाजाला असलेली गरज अधोरेखित केली.महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या 'खेळ पैठणीचा – होम मिनिस्टर' या कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध मनोरंजनात्मक खेळ व स्पर्धांमुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विजेत्या महिलांना मानाच्या पाच पैठणींसह आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

त्यानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांचा पुढाकारकार्यक्रमाचे आयोजन साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गुलाब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष चंद्रकांत शिंदे, सचिव सागर पवार, सुमित उपाडे, सुनिता पवार, खजिनदार गणेश पवार, गोविंद पवार, पप्पू चव्हाण यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी रंगलेला हा जयंती सोहळा उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाला.



# सीसीआयकडून सिंदफणा महिला शेतकरी उत्पादक कंपनीला कॉटन थ्रेडर मशीन

तालखेड येथील कंपनीला आधुनिक यंत्राचे वितरण; कापूस उत्पादक शेतकऱ्यांना होणार तंत्रज्ञानाचा लाभ

माजलगाव : प्रतिनिधी

भारत सरकारच्या अधिपत्याखालील भारतीय कापूस महामंडळाच्या (सीसीआय) छत्रपती संभाजीनगर मुख्यालयाच्या वतीने माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत तालखेड येथील सिंदफणा महिला शेतकरी उत्पादक कंपनीला कॉटन थ्रेडर मशीन प्रदान करण्यात आले. या आधुनिक यंत्रामुळे कंपनीशी जोडलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा लाभ मिळणार असून, कापूस उत्पादन व प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमास सीसीआयचे असिस्टंट मॅनेजर वर्मा सर, धीरज कुमार, गणेश चव्हाण व हर्ष सर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री. जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वीरेंद्र भैय्या सोळंके, वडवणी बाजार समितीचे सभापती संभाजी तात्या शिंदे, संचालक प्रभाकर आप्पा होके पाटील, अमोल राव जाधव, आसारामजी घायतिडक, नंदकिशोर सजगणे, कालू भाई पठाण, टवानी शेठ, जलाल शेठ, प्रशांत होके, सचिव हरिभाऊ सवणे, सहसचिव रवींद्र नाईकनवरे तसेच कापूस विभाग प्रमुख सुनील सवणे यांच्यासह शेतकरी उत्पादक कंपनीचे पदाधिकारी व कापूस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.महिला शेतकरी उत्पादक कंपनीला आधुनिक यंत्र उपलब्ध झाल्यामुळे कापूस प्रक्रियेला चालना मिळणार असून, शेतकऱ्यांना उत्पादनाच्या माध्यमातून अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने सीसीआयचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# बीड येथील इस्कॉन मंदिरातील श्रीमद् भागवत कथेची मोठ्या उत्साहात सांगता

बीड ।प्रतिनिधी

बीड येथील सर्वात प्रसिद्ध असलेले इस्कॉन मंदिर श्री राधा कृष्ण यांच्या पवित्र मंदिर परिसरामध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने इस्कॉन मंदिराच्या वतीने श्रीमद् भागवत कथेचे आयोजन गेल्या सहा दिवसापासून करण्यात आले होते या श्रीमद् भागवत महा कथेच्या ज्ञान यज्ञामध्ये अनेक बीड शहरातील भाविक भक्तांनी कथा श्रवण करण्यासाठी सर्व माता भगिनी यांनी मोठ्या प्रमाणात हजरी लावली होती तसेच सर्व वृद्ध आजोबा आजी यांनी देखील आपली उपस्थिती श्रीमद् भागवत कथेसाठी दर्शविली होती ही कथा गुजरात येथील श्री वेदशास्त्र संपन्न हरिभक्त परायण कृष्णा मेधा जी महाराज श्री प्रभुजी यांच्या पवित्र श्रीमुखातून सर्व भाविक भक्तांना ही रोड कथा सांगण्यात आली या श्री पवित्र श्रीमद् भागवत कथेमध्ये श्री भगवंताने श्रीकृष्णाने गोकुळामध्ये केलेल्या अनेक दिव्य लिलेचे प्रतिपादन या सहा दिवस चालणाऱ्या कथेमध्ये श्री प्रभुजी महाराजांनी सांगितले श्रीमद् भागवत हा एकमेव ग्रंथ आहे हा ग्रंथ नित्य श्रवण केल्याने अनेक जीवांचे उद्धार होतात व मनुष्याला कुठल्याही प्रकारची भीती मनामध्ये राहत नाही व सर्व भाविक भक्तावर अखंड श्री प्रभू कृष्ण कन्हैया ची कृपा प्राप्त होते जो हजारामध्ये खेळत असतो तो लाखांमध्ये खेळतो जो लाखांमध्ये खेळत असतो तो कोरडा मध्ये खेळतो अशी श्री भगवान श्रीकृष्णाची परम कृपा साधकावर होते म्हणून सर्वांनी पवित्र श्रीमद् भागवत कथा ज्या ज्या ठिकाणी चालू असेल त्या त्या



ठिकाणी जाऊन श्रवण करावी व आपल्या जीवनाचे सार्थक व परम कल्याण करून घ्यावे असे प्रतिपादन देखील महाराजांनी केले आज सातव्या सांगतेच्या दिवशी श्रीकृष्णाचे परम सखा भक्त सुदाम जी महाराज यांचे दिव्य सुदामा चरित्र सांगून अनेक भाविक भक्तांना श्री महाराजांनी मंत्रमुग्ध केले नंतर कथेचा समारोप करण्यात आला श्रीमद् भागवत ग्रंथाची महापूजा संपन्न होऊन श्री महाराजांची देखील मंदिर इस्कॉनचे मुख्य आचार्य प्रभू यादव महाराज यांनी शाल श्रीफळ महाराजांना समर्पित करून महाराजांचा मंदिराच्या वतीने सत्कार केला नंतर श्रीमद् भागवत ग्रंथाची मोठ्या उत्साहाच्या आणि आनंदाच्या वातावरणामध्ये हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये महापूजा करून महाआरती संपन्न झाली या आरतीचे यजमान मुख्य यजमान म्हणून भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांना हा मान देण्यात आला त्यांच्या हस्ते व इतर प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते ही महाआरती संपन्न झाली महारतीनंतर सर्वांना महाप्रसाद वाटण्यात आला श्रीमद् भागवत कथेची मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणामध्ये सांगता झाली श्रीकृष्ण कन्हैया यांच्या मंदिराच्या समोर अतिशय आकर्षित सर्व भाविक भक्तांना करणारी रांगोळी देखील या ठिकाणी पूनम कुटे व वैष्णवी कुटे यांनी आकर्षित रांगोळी काढून अनेक भक्तांचे मन या रांगोळीकडे आकर्षित केले या प्रसंगी अनेक बीड शहरातील माता-भगिनी भाविक भक्त मोठ्या संख्येने कथेच्या सांगते साठी उपस्थित होते कथासंपन्न झाल्यानंतर श्रीकृष्ण जन्माष्टमी या निमित्ताने देखील सर्वांनी भगवान श्री राधा दामोदर श्री कृष्ण कन्हैया यांचे दिव्य दर्शन घेण्यासाठी सर्वांनी कृष्णजन्माष्टमीच्या पावन पर्व काळामध्ये यावे असे श्री इस्कॉन मंदिराच्या विश्वस्तांच्या वतीने सर्व बीड शहरातील व सर्व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांना आवाहन करण्यात आले आहे श्रीमद् भागवत कथेच्या समारोप प्रसंगी उपस्थित असलेले बीड शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक व लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बी बी वैद्य साहेब व लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .



# मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा; केज तालुका सकल मराठा समाजाचा शासनाला इशारा

बीड/प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर केज तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. शासनाने मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना उपोषणापासून परावृत्त करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आमरण उपोषण करत असून, त्यांच्या प्रकृतीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली.

दरम्यान, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी बीड जिल्ह्यासह केज तालुक्यात बंदचे आवाहन करण्यात आले असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शासनाने मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या तातडीने मान्य न केल्यास केज शहर व तालुक्यात सकल मराठा समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी सकल मराठा समाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयात निवेदन साद केले. शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शिवाजी दादा ठोंबरे,

भाई मोहन गुंड, राहुल खोडसे,भाऊसाहेब गुंड, संदिप ना ईकवाडे,मुकुंद कणसे,दत्तकुमार काकडे,रामहरी कोल्हे,बालाजी सोंळूके,आदेश देशमुख, वचिष्ट इंगळे राहुल शिंदे,प्रदीप मुळे,ओमकार इंगळे,शिवाजी कदम,बालासाहेब साखरे,चंद्रकांत कदम, काशीनाथ काकडे,बालासाहेब पवार, राजाभाऊ पवार, राजाभाऊ जाधव, बाबासाहेब मुळे,गोवर्धन शिंदे सह असंख्य मराठा बांधव उपस्थित होते.

## खंदारे गुरुजींची गुरुवचने





डॉ संगिता पिंगळे
बीड

सगळ जगणंच त्याचा अनुभव असावा असे गुरुजी म्हणाले.

सगळ जगणंच त्याचा अनुभव असावा असे गुरुजी म्हणाले. सर्वसाधारणपणे सोयीप्रमाणे उपलब्ध व्यक्ति ,वस्तू यांचा वापर करायचा अशी मानवी मानसिकता असते ,मग प्रभू सुद्धा सोयीप्रमाणे सोबत करायचा अस होतं. सदासर्वदा प्रभूला प्राथमिकता देणे फार कठीण जाते. मात्र त्याला नित्य सोबत घेण्याची पराकाष्ठा केली तर तो त्याच्या नित्य उपस्थितीचे अद्भुत अनुभव देतो. यासाठी सद्गुरु कृपा आणि उत्कट प्रेम लागते. गुरुजी आपण कृपा केली खूप त्यामुळे मार्गस्थ आहोत. थँक्स गुरुजी आपला नित्य जयजयकार असो.

# प्रचंड क्रयशक्ती असलेल्या युवावर्गाची व्यसनधिनातेमुळे अपरिमित हानी - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई (प्रतिनिधी) उमेश शिंदे

व्यसनाधीनता हा समाजाला लागलेला शाप असून व्यसनाधीनतेमुळे केवळ व्यसनी व्यक्तीचेच नाही तर त्याच्यासोबत त्याच्या कुटुंबीयांची समाजाची आणि राष्ट्राचे अपरिमित नुकसान होते असे वक्तव्य सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. नशामुक्त महाराष्ट्र अभियाना अंतर्गत पोलीस प्रशासन बीड च्या वतीने आयोजित नशामुक्त समाज या अंमली पदार्थ विरोधी जनजागर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.






एमआयटी इंग्लिश स्कूल नागझरी परिसर या भागात झालेल्या या व्यसनमुक्ती जनजागर कार्यक्रमात विचारमंचावर अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपाधीक्षक ऋषिकेश शिंदे व अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी बाल वयातील संस्कार हे महत्वाचे असतात. यां वयात मुलं निरीक्षनाने आकलन करत असतात आणी त्यांची बुद्धी परिपक्वतेपेक्षा भावनिकतेवर काम करत असते. या वयात मुलांना योग्य मार्गदर्शन आणी संस्कार मिळाल्यास त्यांना आपोआप चांगली नैतिक मूल्य आत्मसात करता येतात. नैतिक संस्काराशिवाय नैतिक अधिष्ठान असलेला नैतिक समाज निर्माण होऊ शकत नाही आणि जोपर्यंत नैतिक समाज निर्माण होत नाही तोपर्यंत ते राष्ट्र महासत्ता बनवू शकत नाही आणि त्यामुळे सर्व महापुरुषांनी समाज हा व्यसनमुक्त असावा आणि विज्ञानवादी असावा या विचारांचा आग्रह धरला होता. सर्व प्रकारची व्यसनी हे निश्चितपणे सुटू शकतात त्यासाठी व्यसनाधीन माणसाची स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती व सुरुवातीच्या काळात योग्य माणूस उपचार तज्ज्ञाचे व समोपदेशकाचे औषधोपचार व समुपदेशन आवश्यक असते असेही डॉ.इंगोले यांनी यावेळी सांगितले. सर्वप्रथम समाजात व्यसनमुक्ती व्हावी म्हणून जनप्रबोधन कार्यक्रम ठेवल्याबद्दल समाजातील जबाबदार नागरिक व्यसनमुक्ती तज्ज्ञ म्हणून बीड पोलीस प्रशासनाचे कौतुक करीत त्यांनी असेच समाज उपयोगी कार्यक्रम येणाऱ्या काळात ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बोलताना उप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी व्यापक जनजागृती आणि अमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. टप्प्याटप्प्याने यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे व्यसनमुक्ती जनप्रबोधन धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे अशी माहिती सांगितली. पोलीस उपाधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी व्यसनमुक्ती ही काळाची गरज आहे. व्यसनाधीनतेमुळे अनेक संसार देशोधडीला लागल्याचे सांगितले.

नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबविणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. पालकांनी आपल्या मुलांवर काळजीपूर्वक लक्ष द्यावे, त्यांचे मित्र, वर्तन याकडे विशेषत्वाने ध्यान देणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून सन २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यां उद्दिष्टाच्या अनुषंगाने शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांमध्ये आणि पालकांमध्ये व्यसनाधीनतेविषयी जागरूकता वाढवावी हा हेतू ठेवून हा कार्यक्रम ठेवण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमआयटी इंग्लिश स्कूलचे विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PUBLISHED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** ON BEHALF OF **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( **MAHARSHTRA** ).
EDITOR- **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB**